सरदार वल्लभभाई पटेल यांची
जयंती “राष्ट्रीय एकता दिवस”
म्हणून साजरा करणेबाबत.
(दि.३१ ऑक्टोबर, २०१७).

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण -११११/(प्र.क्र.१३७/१६)/समन्वय**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २६ ऑक्टोबर, २०१७.

<u>संदर्भ :-</u> संचालक, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार, यांचे दि.११ जुलै व दि.२० जुलै, २०१७ ची पत्रं.

**<u>शासन परिपत्रक -</u>**

संदर्भाधिन पत्रान्वये केंद्र शासनाने दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा जयंती दिवस हा “ राष्ट्रीय एकता दिवस ” म्हणून संपूर्ण देशात साजरा करण्याचे ठरविले आहे.

२. सरदार पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात अतुल्य असे योगदान दिले असून, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या एकसंघीकरणात मोलाचे कार्य केले आहे म्हणूनच त्यांना भारताचे लोहपुरुष असे संबोधण्यात येते. एकात्म भारताच्या निर्मितीसाठी त्यांनी केलेले हे काम लक्षात घेता, त्यांच्या जयंतीनिमित्त खालील उपक्रम /कार्यक्रम सर्व विद्यापीठे /महाविद्यालये /शैक्षणिक संस्थांनी राबविण्याचे निदेश देण्यात येत आहेत. :-

१) राज्य / जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधून, समाजातील सर्व घटकातील मान्यवरांसह विद्यार्थी व शिक्षक यांची जास्तीत जास्त उपस्थिती ठेवण्यासाठी पुढाकार घेण्यात यावा.

२) या परिपत्रकासोबत जोडलेली “ राष्टीय एकता दिवस ” ही शपथ घेण्यात यावी.

३) “ सध्याच्या भारतात सरदार वल्लभभाई पटेल यांचे महत्व ” या विषयावर विद्यापीठ/ महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था यांच्या स्तंरावर वक्तृत्व / निबंध स्पर्धेचे आयोजन करणे.

४) सरदार वल्लभभाई पटेल यांच्या चरित्रावर आधारित व एकात्मतेसंदर्भात संगीत, नाटक व एकांकिका स्पर्धा आयोजित कराव्यात. यातील सर्वात सर्जनशिल थीमला ( Most of Theme ) पारितोषिक देण्यात यावे.

५) एकता ( Unity ) या थीमवर सर्जनशिल घोषवाक्य तयार करण्यात यावे. ( Most Creative Slogan) तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.

६) एकता (Unity ) या थीमवर लेखन /कंपोझिंग /गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.

७) विद्यापीठे / महाविद्यालये/ शैक्षणिक संस्थेतील प्राध्यापकांकरीता सरदार पटेल यांच्या जीवनपटाविषयी व्याख्याने व स्पर्धा आयोजित कराव्यात.

८) विद्यार्थ्यांने त्यांच्या भागात राहणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या भेटी घ्याव्यात व त्यांची माहिती लिहून घ्यावी.

९) सरदार पटेल यांच्या जीवनकथावर आधारित कथाकथनाचे आयोजन करावे.

३. उपरोक्त नमूद केलेल्यापैकी कोणत्याही किमान दोन उपक्रमांचे आयोजन सर्व व्यवस्थापनाच्या सर्व विद्यापीठे / महाविद्यालये /शैक्षणिक संस्थांमध्ये करण्याबाबतच्या आवश्यक त्या सूचना संचालक ( उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण / कला शिक्षण / ग्रंथालय ) यांनी त्यांच्या स्तरावरुन देण्याची कार्यवाही करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०२७११४२१२८२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2017.10.27 11:32:51 +05'30'

( सिद्धार्थ खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व कुलगुरु / कुलसचिव, अकृषि विद्यापीठे.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. अ. मु. स. ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग ) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. निवडनस्ती.

## राष्ट्रीय एकता दिवस शपथ

मैं सत्यनिष्ठा से शपथ लेता हूँ कि मैं राष्ट्र की एकता, अखंडता और सुरक्षा को बनाए रखने के लिए स्वयं को समर्पित करूंगा और अपने देशवासियों के बीच यह संदेश फैलाने का भी भरसक प्रयत्न करूंगा। मैं यह शपथ अपने देश की एकता की भावना से ले रहा हूँ जिसे सरदार वल्लभभाई पटेल की दूरदर्शिता एवं कार्यों द्वारा संभव बनाया जा सका। मैं अपने देश की आंतरिक सुरक्षा सुनिश्चित करने के लिए अपना योगदान करने का भी सत्यनिष्ठा से संकल्प करता हूँ।

## RASHTRIYA EKTA DIWAS PLEDGE

I solemnly pledge that I dedicate myself to preserve the unity, integrity and security of the nation and also strive hard to spread this message among my fellow countrymen. I take this pledge in the spirit of unification of my country which was made possible by the vision and actions of Sardar Vallabhbhai Patel. I also solemnly resolve to make my own contribution to ensure internal security of my country.